जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २७०** **दिनांक :- २९/०९/२०२१**

# खुनाच्या गुन्हयातील फरार आरोपीस अटक-गुन्हे शाखा कक्ष -३, विरार यांची कामगिरी.

दिनांक २६/०९/२०२१ रोजी रात्रौ २१.१५ वा.चे सुमारास फिर्यादी श्रीमती सुषमा सुंदर शेट्टी वय- ४७ वर्षे रा- नरेंद्र माऊली अर्पाटमेंट, फुलपाडा, विरार पुर्व व त्यांची मुलगी सौ. सुप्रिया जगदीश गुरव वय- २८ वर्षे असे त्यांचे घरी असताना आरोपीत जगदीश दत्ताराम गुरव वय- ३५ वर्षे याने कौटुंबिक कारणांवरुन भांडण करुन फिर्यादी यांचे डोके भिंतीवर आपटले. त्यावेळी त्याची पत्नी सौ सुप्रिया गुरव हीने जगदीश गुरव यास बाजुला ढकलले असता आरोपीने स्वंयपाक घरातील चाकु घेवून त्याची पत्नी सौ. सुप्रिया गुरव हीचे छातीमध्ये भोसकुन तीला जीवे ठार मारले व श्रीमती सुषमा शेट्टी यांचे उजवे हाताचे मनगटावर व हातावर वार करुन जखमी केले. सदर घटनेबाबत आरोपी विरुध्द विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नंबर ८५४/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३०२,३०७,५०४ प्रमाणे दिनांक २७/०९/२०२१ रोजी दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा केल्यानंतर यातील आरोपी जगदीश गुरव हा फरार झाला होता. त्याचा शोध घेत असताना तो दिनांक २८/०९/२०२१ रोजी सायंकाळचे सुमारास फुलपाडा धरण परिसरात आला असल्याची खात्रीशीर माहीती मिळाल्याने आरोपीत जगदीश दत्ताराम गुरव वय- ३५ वर्षे, रा- रामचंद्र नगर, फुलपाडा, विरार पुर्व यास ताब्यात घेवून पुढील कारवाई करीता विरार पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात आले असून त्यास अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीतास मा. न्यायालयाने दिनांक ०४/१०/२०२१ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर केली आहे.

सदरची कामगिरी श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष -३ चे पोलीस निरीक्षक / प्रमोद बडाख, पो.उप.निरी/ शिवाजी खाडे, पो.उप.निरी/ उमेश भागवत, सपोफौ/ अनिल वेळे, पोहवा/ अशोक पाटील, पोना/ शंकर शिंदे, मनोज सकपाळ, मुकेश तटकरे, सचिन घेरे, प्रदीप टक्के, सागर बारवकर, पोशि/ राकेश पवार यांनी कौशल्यपुर्वक पार पाडली आहे.